लोकमत

विद्यार्थ्यांना कार्यशाळेत 'सायबर सुरक्षा'चे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळा : एन. ई. एस. हायस्कूल आणि एन. ई. एस. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी 'सायबर सुरक्षा' मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित केली होती. डिजिटल युगात खबरदारी कशी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

ऑनलाइन फसवणुकीत अडकल्यास तातडीची कोणती पावले उचलावीत, हेही सांगण्यात आले.

तज्ज्ञ स्वयंसेवक अक्षय पाटील व लोकेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांच्या विविध प्रकारांबद्दल आणि ऑनलाइन फसवणुकीपासून बचावाच्या उपाययोजनांची माहिती दिली. डिजिटल खात्यांची सुरक्षा बळकट करण्यासाठी प्रात्यक्षिकांसह मजबूत पासवर्ड, ज्यात अक्षरे, अंक आणि विशेष चिन्हांचा समावेश असावा, तसेच 'टू-स्टेप व्हेरिफिकेशन'चा वापर याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

ही कार्यशाळा एन. ई. एस. हायस्कूलचे प्राचार्य महेंद्र जोगी व एन. ई. एस. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य शरद अहिरे यांच्या संकल्पनेतून पार पडली. कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.